वर्ष- ११ | अंक- २२ | मुंबई, मंगळवार,१५ एप्रिल ते २१ एप्रिल २०२५ | पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027
PG 2

# पोलीस बातमी पत्र
# POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

अननस खाल्याने सर्व रोग होतात दूर

3 → उद्याचे भविष्य कबरीत बंद करू नका!
मुंबई पोलिसांच्या सायबर प्रयोगशाळेसह विविध उपक्रमांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## मालवणीतील १४ हजार झोपड्यांचे म्हाडा करणार पुनर्वसन, ५१ हेक्टर जागेवरील राजीव गांधी नगरच्या पुनर्वसनासाठी लवकरच सल्लागार, वास्तुविशारदाची नियुक्ती

**मुंबई :** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या रखडलेल्या २१ झोपडपट्टी पुनर्वसन योजना म्हाडाकडे सोपविण्यात आल्या आहेत. या योजनांमधील सर्वात मोठी मालाड, मालवणी येथील १४ हजार झोपड्यांचा समावेश असलेली झोपु योजना मार्गी लावण्यासाठी अखेर म्हाडाच्या मुंबई मंडळाने पहिले पाऊल उचलले आहे. ५१ हेक्टर जागेवर वसलेल्या राजीव गांधी नगरच्या पुनर्वसन योजनेसाठी सल्लागार आणि वास्तुविशारदाची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी शनिवारी मुंबई मंडळाने एक निविदा प्रसिद्ध केली. या निविदेनुसार वास्तुविशारद प्रकल्प आराखडा तयार करण्यासह निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन करणार आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सहा वर्षांचा कालावधी लागणार आहे. महत्त्वाचे म्हणजे ही म्हाडाची आतापर्यंतची सर्वात मोठी झोपु योजना आहे.




**आतापर्यंत म्हाडाच्या तीन योजनांना आशय पत्र**

राज्य सरकारच्या निदेर्शानुसार म्हाडाला रखडलेल्या २१ झोपु योजना झोपु प्राधिकरणाने सोपविल्या आहेत. यापैकी व्यवहार्य १७ योजना मुंबई मंडळ मार्गी लावणार आहे. त्यानुसार याआधी मंडळाने जोगेश्वरीतील साई बाबा झोपु योजना, कुल्यार्तील श्रमिक नगर आणि चेंबूरमधील जागृती झोपु योजना हाती घेतली आहे. या तिन्ही योजनांसाठी झोपु प्राधिकरणाकडून मंडळास आशय पत्र (एलओआय) प्राप्त झाले आहे. लवकरच या योजना मार्गी लागणार आहेत. पण आता मात्र मंडळाने सर्वात मोठी झोपु योजना हाती घेतली आहे. आशय पत्र मिळालेल्या तीन योजना अगदी छोट्या, १५०० ते २००८ चौरस मीटर जागेवरच्या आहेत. पण मंडळाच्या गोरेगाव विभागाने हाती घेतलेल्या राजीव गांधी नगर पुनर्वसन योजनेअंतर्गत ५१ हेक्टरवरील तब्बल १४ हजार झोपड्यांचे पुनवर्सन केले जाणार आहे. संयुक्त भागीदारी तत्वावर राबविण्यात येणाऱ्या पुनर्वसन योजनेसाठी आता मंडळ सल्लागार आणि वास्तुविशारदाची नियुक्ती करणार आहे. यासाठी मंडळाने निविदा प्रसिद्ध केल्याची माहिती मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

**सल्लागाराची कामे**

योजनेचा सविस्तर प्रकल्प आराखडा, निविदा दस्तऐवज तयार करून निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी आणि प्रकल्पाचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रकल्प नियोजन सल्लागार आणि वास्तुविशारदाची नियुक्ती केली जाणार आहे. त्यानुसार इच्छुक कंपन्यांना ६ मेपर्यंत निविदा सादर करता येणार आहेत. सल्लागार झ वास्तुविशारदान्या नियुक्तीनंतर आराखडा तयार करून त्यास मान्यता घेत या योजनेस झोपु प्राधिकरणाकडून शक्य तितक्या लवकरच आशय पत्र मिळविण्याचे मंडळाचे नियोजन आहे.

**१५ वर्षांपासून रखडलेली योजना**

राजीव गांधी नगर झोपु योजना खासगी विकासकाच्या माध्यमातून मार्गी लावण्यात येणार होती. त्यासाठी विकासकाची नियुक्तीही केली होती. मात्र हा प्रकल्प आर्थिक आणि तांत्रिक कारणामुळे अव्यवहार्य ठरल्याने १५ वर्षांपासून ही योजना रखडली होती. परिणामी १४ हजार झोपडीधारक पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत होते. पण आता मात्र त्यांची ही प्रतीक्षा संपणार असून येत्या सहा वर्षांत त्यांचे पुनर्वसनाचे स्वप्न पूर्ण होणार आहे. त्यामुळे राजीव गांधी नगरमधील १४ हजार झोपडीधारकांना हा मोठा दिलासा आहे. दरम्यान, या पुनर्विकासातून मुंबई मंडळाला मोठ्या संख्येने सोडतीसाठी अतिरिक्त घरे उपलब्ध होणार आहेत. या घरांची नेमकी संख्या आराखडा अंतिम झाल्यास जाहीर होईल.

**रमाबाई नगरच्या धर्तीवर पुनर्वसन**

एमएमआरडीए घाटकोपरमधील माता रमाबाई नगर, कामराज नगरचे पुनर्वसन संयुक्त भागीदारी तत्वावर करीत आहे. ही योजनेप्रमाणेच राजीव गांधी नगर योजनाही मार्गी लावली जाणार आहे. महत्त्वाचे म्हणजे रमाबाई नगर योजना जितकी मोठी आहे, तितकीच राजीव गांधी नगर योजनाही मोठी आहे. रमाबाई नगर पुनर्वसन योजनेद्वारे तब्ब्ल १४,४५४ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. तर राजीव गांधी नगरमधील झोपड्यांची संख्याही रमाबाई नगरप्रमाणे १४ हजार इतकी आहे.




## विदर्भात मात्र अवकाळीचा मारा

**मुंबई।** केंद्रीय हवामानशास्त्र विभागानं दिलेल्या माहितीनुसार १० एप्रिल रोजी देशाच्या विविध राज्यांमध्ये हवामानाची वेगवेगळी स्थिती पाहायला मिळेल. राजच्यातील दक्षिणेकडे कमी दाबाचा पट्टा आणि तीव्र वाऱ्याचं क्षेत्र तयार होत असतानाच राजस्थान, दिल्ली, मध्य प्रदेश मात्र उष्णतेची लाट अधिक तीव्र होताना दिसेल. पुढील २४ तासांमध्ये आयएमडीनं दक्षिण भारतामध्ये पावसाचा इशारा जारी केला असून, मध्य आणि उत्तर भारतामध्ये मात्र तापमानात वाढ अपेक्षित असेल असं सांगितलं आहे. इथं महाराष्ट्रात उष्णतेमुळं होणारी होरपळ अद्याप थांबलेली नाही. राज्यातील विदर्भ क्षेत्रावर सूर्यकिरणांचा तीव्र मारा सातत्यानं सुरू असून, त्यामुळं नजीकच्या भागांमध्येही या उष्णतेच्या झळा पोहोचू लागल्या आहेत. मराठवाडा, मध्य महाराष्ट्रासह पश्चिम महाराष्ट्रातही हीच स्थिती पाहायला मिळत आहे.

## बारवर क्राईम ब्रांचचा छापा... २० जणांवर गुन्हा दाखल

**ठाणे :** ठाण्यातील मॉडेला चेकनाका भागातील एका बारवर ठाणे पोलिसांच्या क्राईम ब्रांचने कारवाई केली. या बारमध्ये नियमांचे उल्लंघन सुरु होते. तसेच बारमधील वेटर महिला ग्राहकांसोबत अश्लील कृत्य करत होते. याप्रकरणी श्रीनगर पोलीस ठाण्यात बारचा व्यवस्थापक, महिला वेटर, ग्राहक अशा २० जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

मॉडेला चेकनाका परिसरातील बार नियमांचे उल्लंघन करुन सुरू असल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या युनीट पाचला मिळाली होती. या माहितीच्या आधारे युनीट पाचचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सलील भोसले यांच्या सूचनेनुसार, १० ते १५ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक बारवर छापा टाकण्यासाठी निघाले. रविवारी रात्री १०.४५ वाजताच्या सुमारास युनीट पाचच्या पथकाने बारमध्ये छापा टाकला. त्यावेळी बारमध्ये मोठ्या आवाजात ध्वनीक्षेपकावर गाणी वाजविली जात होती. पाच महिला बारच्या मंचावर नृत्य करत होत्या. तर तीन वेटर महिला ग्राहकांसमोर अश्लील नृत्य करत होते.



**ग्राहक मुंबईचे**

या बारमध्ये पोलिसांनी आठ ग्राहकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यातील ग्राहक ठाण्यासह मुंबई भागातील असल्याचे समोर आले आहेत. यातील दोघे भांडूपचे, एक विक्रोळीचा, एक काळबादेवीचा आहे. तर उर्वरित ठाण्यातील वागळे इस्टेट, लोकमान्यनगर, किसननगर भागातील असून एकजण मुंब्रा येथील आहे.

पोलिसांच्या पथकाने त्यांची ओळख उपस्थितांना सांगितली. तसेच चौकशीला सुरुवात केली. पोलिसांनी या आठही महिलांची विचारणा केली. त्यावेळी त्यांनी त्यांचे नाव आणि पत्ते पोलिसांना सांगितले. या सर्व महिला नवी मुंबई, ठाणे आणि मिरारोड भागातील असल्याचे समोर आले. तसेच त्या २२ ते ३० या वयोगटातील होत्या. त्यानंतर पोलिसांनी येथील व्यवस्थापकाला परवान्याबद्दल विचारणा केली असता, त्याने पोलिसांसमोर कोणताही परवाना सादर केला नाही. व्यवस्थापकासह पोलिसांनी बारमधील इतर तीन कर्मचाऱ्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली. तसेच बारमध्ये आलेल्या इतर आठ ग्राहकांची देखील चौकशी केली.

या प्रकरणात पोलिसांनी झडती घेतली असता, ग्राहकांनी बारमध्ये उधळलेल्या २ हजार ४६० रुपये आणि व्यवस्थापक बसतो तेथून ३ हजार ७८० रुपये पोलिसांना आढळून आले. याप्रकरणी पोलिसांनी श्रीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे, महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे, मद्यपान कक्ष यामधील अश्लील कृत्यांना प्रतिबंध घालण्याबाबत व महिलाच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ चे कलम ८ (२), भारतीय न्याय संहितेचे कलम २९६ आणि ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

## ७ कोटी ७५ लाखांची महापालिकेची शाळा धूळखात




**नवी मुंबई :** नेरूळ सेक्टर ३० येथे नवी मुंबई मनपाने सुमारे ७ कोटी ७५ लाख खर्च करून महानगरपालिकेने सुसज्ज अशी शाळा बांधली आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून उभी केलेली ही इमारत विद्यार्थ्यांविना धूळखात पडून आहे. या प्रकरणी शिवसेना (उबाठा) उपशहर प्रमुख यांनी आयुक्तांना शाळा सुरू करावी, असे निवेदन दिले असून शाळा जून मध्ये सुरू न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन केले जाईल, असा इशारा दिला आहे. नेरूळ सेक्टर ३० येथील भूखंड क्रमांक ८अ ए येथे भव्य शाळा इमारत बांधण्यात आली आहे. शिक्षण विभागाकडे इमारत सुपूर्द करण्यात आली आहे. मात्र गेले अनेक महिने ही इमारत धूळखात पडून आहे. सुमारे ७ कोटी ७५ लाख खर्च करून महानगरपालिकेने सुसज्ज अशी शाळा बांधली आहे. या शाळेचे काम पूर्ण झाले असून अभियांत्रिकी विभागाने या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन ही इमारत ११ नोव्हेंबर २०२४ रोजी मालमत्ता विभागास हस्तांतरित केली.

मालमत्ता विभागाने त्यांच्या विभागाची कार्यपूर्तता करून ३० जानेवारीला शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करत असल्याचे पत्र दिल्याचा दावा शिवसेना (उबाठा) उपशहर प्रमुख समीर बागवान यांनी केला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेक्टर-५० येथील शाळाक्रमांक ९३ या शाळेमध्ये सीबीएससी शिक्षण पद्धतीनुसार बालवाडी ते इयत्ता आठवीपर्यंत प्रवेश प्रक्रियेसाठी ५२५ पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले होते, यातील ५०० पेक्षा अधिक विद्यार्थी प्रतीक्षा यादीत आहेत. एकीकडे एवढी मोठी प्रतीक्षा यादी आहे, जी शाळा आहे त्यात जागा कमी पडत आहे, तर दुसरीकडे शाळा इमारत उभी असून सर्व व्यवस्था असताना शाळा सुरू केली जात नाही. त्यामुळे प्रतीक्षा यादीतील मुलांवर अन्याय होत असल्याची प्रतिक्रिया अनेक पालकांनी व्यक्त केली आहे.

## पालघरमध्ये सासऱ्याने केली जावयाची हत्या... गाढ झोपेत असताना कुऱ्हाडीने केले वार

**पालघर :** महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. पैशाच्या वादावरून ७५ वर्षीय वृद्धाने आपल्या जावयाची कुऱ्हाडीने हत्या केल्याची घटना समोर आली आहे. हत्या केल्यानंतर आरोपी पळून गेला असल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने एका वृत्तसंस्थेला दिली आहे. ही घटना वाडा परिसरात सोमवार आणि मंगळवारच्या रात्री घडली आहे. ४२ वर्षीय मृत व्यक्ती लोकांना नोकरी देण्याचे आश्वासन देऊन पैसे घेत होता. पण तो कधीही तो नोकरी देण्याचे काम पूर्ण करत नव्हता. अशाच प्रकारे मृत व्यक्तीने त्याच्या सासऱ्यांकडून देखील पैसे घेतले होते. याच पैशावरून दोघांमध्ये अनेकदा वाद देखील झाला. अनेकदा भांडणे देखील झाल्याची माहिती वाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांनी दिली. मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी आरोपीच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी मंगळवारी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१) खून अंतर्गत एफआयआर नोंदवला आहे. परंतु, अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक तैनात केले आहे. लवकरच आरोपीला अटक होईल असं अधिकाऱ्याने सांगितले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढली आहे.





# आरोग्य



## अननस खाल्ल्याने सर्व रोग होतात दूर



अननस चवीला आंबट आणि गोड दोन्ही आहे. त्यात चवीचा एक अनोखा मेळ आहे, जो खाण्यास आनंददायी आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की हे एक असे फळ आहे जे चवीनुसार अद्वितीय आहे.

याशिवाय हे आपल्या आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की अननसमध्ये अनेक पोषक घटक आढळतात. हे पोषक तत्व केवळ आपल्या शारीरिकच नव्हे तर आपल्या मानसिक आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे.चला तर मग जाणून घ्या.

**व्हिटॅमिन सी समृद्ध–**

अननसमध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. व्हिटॅमिन सी आपल्या शरीराची प्रतिकारशक्ती वाढवते. व्हिटॅमिन सी देखील अँटिऑक्सिडंट्सचा चांगला स्रोत आहे. याचे सेवन केल्याने मुरुम आणि त्वचेशी संबंधित समस्यांपासून आराम मिळू शकतो.

**पचन चांगले होणार–**

अनुनासिक एन्झाइम ब्रोमेलेन अननसात मुबलक प्रमाणात आढळते. हे पचन सुधारण्यासाठी उपयुक्त आहे. त्याचे सेवन केल्याने खाण्याची प्रक्रिया सुलभ होते आणि अन्न सहज पचते. यासोबतच अन्नाचा लाल रंग तोडण्यास मदत होते.

**हाडांसाठी फायदेशीर –**

या फळामध्ये कॅल्शियम आणि मॅग्नेशियम मुबलक प्रमाणात असते. याच्या सेवनाने हाडे मजबूत होतात. अननसात असलेले मॅग्नेशियम मानसिक आरोग्यासाठी खूप चांगले असते.

**पचन संस्थाचांगली होते–**

अननस हे विशेष एन्झाईम्समुळे पचन सुधारण्यास मदत करते. याच्या सेवनाने तुमची पचनक्रिया मजबूत होते.

**ग्लुकोज पातळी नियंत्रणात होते–**

या फळामध्ये फायबरचे प्रमाण चांगले असते. याचे सेवन केल्याने शरीरातील ग्लुकोजची पातळी नियंत्रणात राहते. त्याचबरोबर या फळामुळे मधुमेहाचा धोकाही कमी होतो.

**त्वचेची काळजी–**

अननसमध्ये व्हिटॅमिन सी आढळते. व्हिटॅमिन सी तुमची त्वचा निरोगी आणि चमकदार बनवण्यास मदत करते. याशिवाय, ते कोलेजनच्या निर्मितीला देखील प्रोत्साहन देते. हे त्वचेवरील धूळ आणि घाण काढून टाकण्यास मदत करते.

**निरोगी पर्याय–**

अननस स्वादिष्ट असण्यासोबतच आरोग्याला अनेक प्रकारे फायदेशीर ठरते. अशा परिस्थितीत हे फळ आरोग्यदायी पर्याय ठरू शकते. या फळाचा समावेश तुम्ही तुमच्या आहारात सॅलड, स्मूदी, ताजी फळे किंवा तंदूरी भाजीच्या स्वरूपात करू शकता.

अननसमध्ये असल्या चवीच्या आंबटपणा आणि गोडपणा आणि अनेक पोषक घटक आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. अशा परिस्थितीत तुम्ही या फळाचा आहारात समावेश करू शकता.

## सकाळी रिकाम्या पोटी चणे आणि शेंगदाणे खाण्याची योग्य पद्धत

चणे आणि शेंगदाणे हे दोन्ही पौष्टिक पदार्थ आहेत. त्यात प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांसारखे अनेक पोषक घटक मुबलक प्रमाणात आढळतात. हे दोन्ही एकत्र खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात. हरभऱ्यामध्ये प्रथिने, फायबर, लोह, चरबी आणि कॅलरीज असतात. तर शेंगदाणे ओमेगा ६, कॅल्शियम आणि ओमेगा ३ फॅटी ॲसिडचा चांगला स्रोत मानला जातात.

**अशक्तपणा दूर होतो**

हरभरा आणि शेंगदाण्यात लोहाचे प्रमाण जास्त असते. लोह शरीरात रक्त तयार करण्यास मदत करते. ॲनिमियाच्या रुग्णांना सकाळी रिकाम्या पोटी हरभरे आणि शेंगदाणे खाल्ल्याने फायदा होऊ शकतो.

**पाचक प्रणाली मजबूत राहते**

हरभरा आणि शेंगदाणे दोन्ही फायबरचे चांगले स्रोत आहेत. फायबरमुळे पचनसंस्था निरोगी राहण्यास मदत होते. सकाळी रिकाम्या पोटी हरभरे आणि शेंगदाणे खाल्ल्याने बद्धकोष्ठता, अपचन आणि गॅससारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

**रक्तदाब नियंत्रित राहते**

हरभरा आणि शेंगदाण्यात पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते. पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. सकाळी रिकाम्या पोटी हरभरे आणि शेंगदाणे खाणे उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरू शकते.

**वजन कमी करण्यास मदत करते**

हरभरा आणि शेंगदाण्यात प्रथिनांचे प्रमाण जास्त असते. प्रथिने वजन कमी करण्यास मदत करतात. सकाळी रिकाम्या पोटी हरभरा आणि शेंगदाणे खाल्ल्याने शरीराला दीर्घकाळ ऊर्जा मिळते, ज्यामुळे भूक कमी होते आणि वजन कमी होण्यास मदत होते.

**प्रतिकारशक्ती मजबूत करते**

हरभरा आणि शेंगदाण्यात अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात. अँटिऑक्सिडंट्स शरीराची प्रतिकारशक्ती मजबूत करण्यास मदत करतात. सकाळी रिकाम्या पोटी हरभरे आणि शेंगदाणे खाल्ल्याने शरीराला संसर्गाशी लढण्याची क्षमता मिळते.

**कोलेस्ट्रॉल कमी करते**

हरभरा आणि शेंगदाण्यामध्ये ओमेगा-३ फॅटी ऍसिडचे प्रमाण जास्त असते. ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. सकाळी रिकाम्या पोटी हरभरे आणि शेंगदाणे खाल्ल्याने हृदय निरोगी राहण्यास मदत होते.

**सकाळी रिकाम्या पोटी हरभरा आणि शेंगदाणे कसे खावे**

सकाळी रिकाम्या पोटी हरभरा आणि शेंगदाणे खाणे सर्वात फायदेशीर आहे. हरभरे आणि शेंगदाणे नीट धुवून खावे. रात्री भिजवून दुसर्या दिवशी पाण्यातून काढून देखील याचे सेवन करता येते. याशिवाय ते वाटून खाऊ शकतात. अंकुरलेले हरभरे आणि शेंगदाणे सकाळी रिकाम्या पोटी खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात.

रोज सकाळी एक वाटी हरभरा आणि शेंगदाणे खाल्ल्याने फायदा होतो. हे तयार करण्यासाठी, प्रथम हरभरा आणि शेंगदाणे समान प्रमाणात घ्या आणि भिजवा. रात्रभर भिजवल्यानंतर सकाळी गाळून स्वच्छ करा. आता टोमॅटो, कांदा, गाजर आणि बीटरूट यांसारख्या गोष्टी चिरून घ्या आणि मिक्स करा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही त्यात थोडेसे काळे मीठही टाकू शकता. सकाळी न्याहारी करताना याचे नियमित सेवन करावे.







## जायफळ एक गुण अनेक!

जायफळमध्ये कफ आणि वात, घामाचा दुर्गंध, जंत, खोकला, श्वास घेण्यास होणारा त्रास, हृदयरोग अशा व्याधींपासून मुक्ती देणारे गुणधर्म आहेत. जायफळ वेदनाशामक, वातशामक आणि कृमीनाशक आहे. पचनसंस्थेचे कार्य सुरळीत करण्यासाठी जायफळाचा खूप उपयोग होतो. जायफळाच्या तेलात आणि चूर्णातही औषधी गुणधर्म आढळतात. त्याचा विविध प्रकारे उपयोग करता येतो. दगडावर जायफळ पाण्याबरोबर घासावे आणि लेप तयार करावा. हाल लेप डोळ्यांच्या पापण्यावर आणि आजूबाबूला लावल्याने दृष्टी तेज होते.

तसेच चेहऱ्यावरील डाग नाहीसे होतात. संधिवातामुळे शरीराला असह्य वेदना होतात. संधिवातावर उपचार म्हणून तसेच जखम होणे, चमक भरणे, सूज येणे अशा वेळी जायफळ आणि सरसोचे तेल एकत्र करून मालिश केल्याने आराम मिळतो. या मिश्रणाने मालिश केल्याने शरीरात उष्णता निर्माण होते आणि घामाच्या स्वरूपात रोग नाहीसा होतो.

पोटात दुखत असेल तर जायफळाच्या तेलाचे २-३ थेंब साखरेत मिसळून खावेत.

दातांच्या वेदना दूर करण्यासाठीही जायफळाचा उपयोग होतो.

सर्दी आणि डोकेदुखीपासून मुक्ती मिळविण्यासाठी जायफळाची पावडर गरम पाण्यात एकत्र करून तो लेप नाकाच्या आजूबाजूला आणि कपाळावर लावणे फायदेशीर ठरते.

बाळाला कफ झाला असताना किंवा रात्री झोप लागत नसेल तर हा लेप उपयोगी पडतो.

बाळाला वरचे दूध पिण्याची सवय लावणे हे प्रत्येक आईसाठी कठिण काम असते. वरचे दूध पचत नसेल तर दुधामध्ये थोडे पाणी मिसळून त्यात जायफळ घालून उकळावे. दूध कोमट झाल्यावर हळूहळू बाळाला पाजावे. असे केल्याने बाळाला दूध पचते.

## तिखट झोंबंत असेल तर या उपायांनी लगेच तोंडाला आराम मिळेल



तिखट-मसालेदार पदार्थ खाल्ल्यास चवीला खूप चविष्ट लागते, पण आरोग्यासाठी ते चांगले नाही, खासकरून जर तुम्ही तुमच्या जेवणात लाल मिरची वापरत असाल तर. जर तुम्हाला थोडेसे मसालेदार अन्न आवडत असेल तर हिरव्या मिरच्यांसोबत मसाला घालणे अधिक योग्य. चव आणि आरोग्य या दोन्ही बाबतीत हे सर्वोत्कृष्ट आहे, परंतु जर तुम्ही अशा लोकांपैकी असाल ज्यांना मसालेदार अन्न अजिबात सहन होत नाही, तर साहजिकच इतर ठिकाणी खाणे तुमच्यासाठी मोठे आव्हान ठरत असेल. जर तुम्हाला इतर लोकांप्रमाणे मिरचीचा मुबलक वापर करून बनवलेल्या भाजीचा आस्वाद घेता येत नसेल आणि जेवतानाच नाही तर नंतरही त्रास होत असेल तर आजचा लेख फक्त तुमच्यासाठी आहे. जेव्हा केव्हा तुम्हाला जेवणाचा चटपटीतपणा सहन होत नाही, काही पदार्थ खाल्ल्यानंतर डोळ्यातून पाणी येऊ लागते, कानातून धूर येतो आणि जीभ खूप जलद जळू लागते, तेव्हा हे उपाय करून पहा, ज्यामुळे खूप लवकर आराम मिळेल. मसालेदार पदार्थांमुळे जळजळ का होते?

तज्ज्ञांच्या मते, मिरचीमध्ये कॅप्सेसिन नावाचे रसायन असते. जेवताना ते तुमच्या टिश्यूच्या संपर्कात येताच, जळजळ होऊ लागते, ज्यामुळे जीभ जळू लागते. जिभेमध्ये TRPV1 वेदना ग्रहण करणारा असतो, त्यामुळे तो कॅप्सेसिनच्या संपर्कात येताच मेंदूला संदेश देतो की आपण काहीतरी चुकीचे खाल्ले आहे आणि त्याचा वेदना ग्रहण करणाऱ्यावर परिणाम होतो. डोळ्यांना आणि नाकातून पाणी येण्यासोबतच घामही येऊ लागतो.

तिखट झोबंत असल्यास काय करावे?

जिभेला तिखट वाटू लागल्यावर लगेच दूधाचे किवा दुधापासून तयार केलेल्या पदार्थांचे सेवन करावे. दुधा कॅसीन नावाचे प्रोटीन असतं ज्यामुळे दुधाचा रंग पांढरा असतो. याचे सेवन केल्याने जळजळ दूर होते. आपण दहीचे सेवन ही करु शकता. तिखट झोंबल्यावर लगेच चमचाभर साखर खाल्ल्याने जळजळ शांत होते पण यासाठी काही वेळ लागतो. अशात साखराऐवजी मधाचे सेवन करावे. कोमट किंवा नॉर्मल पाण्यात मध मिसळून प्यावे. जवळ काही उपलब्ध नसल्यास या समस्येपासून सुटका करण्यासाठी लाळ काढणे देखील प्रभावी उपाय ठरु शकतं. यासाठी जीभ बाहेर काढावी आणि लाळ तयार होऊ द्यावी नंतर लाळ काढून दिल्याने लगेच आराम होतो.

## उकडलेल्या स्वीट कॉर्नचे आरोग्यदायी फायदे जाणून घ्या



लोकांना पावसाळ्यात अनेकदा कॉर्न खायला आवडते. शहर असो वा गाव, बहुतेक लोकांना कणीस खायला आवडते. लोक ते मोठ्या उत्साहाने खातात. प्रत्येकाच्या आवडीनिवडी वेगळ्या असल्या तरी. काही लोक ते भाजून खातात, तर काही लोक ते उकळवून किंवा वेगवेगळ्या स्नॅक्समध्ये मिसळून खातात.उकडलेल्या स्वीटकॉर्नचे आरोग्यदायी फायदे जाणून घ्या.

**उकडलेले कॉर्न खाण्याचे फायदे**

**रोगप्रतिकारशक्ती वाढेल–**

उकडलेले कॉर्न खाल्ल्याने तुमची प्रतिकारशक्ती वाढते. कारण त्यात व्हिटॅमिन सी आणि ए आढळतात. जे शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्याचे काम करते. याशिवाय शरीराला हंगामी आजारांपासून वाचवते.

**पचनासाठी फायदेशीर–**

उकडलेल्या कॉर्न मध्ये फायबर मुबलक प्रमाणात आढळते. जे पचनसंस्था मजबूत करण्याचे काम करते. उकडलेले मक्याचे सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते. याशिवाय पचनाच्या समस्याही दूर होतात.

**हृदयासाठी फायदेशीर–**

उकडलेले कॉर्न हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. उकडलेल्या मक्यामध्ये कोलेस्ट्रॉल आणि रक्तदाब नियंत्रित करणारे गुणधर्म आढळतात. याच्या सेवनाने हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

**लठ्ठपणा कमी होतो–**

लठ्ठपणाचा त्रास असलेल्या लोकांसाठी उकडलेले कॉर्न फायदेशीर आहे. कारण उकडलेले कॉर्न खाल्ल्याने पोट बराच काळ भरलेले राहते. यामुळे तुम्हाला वारंवार भूक लागत नाही आणि तुम्ही जास्त खाणे देखील टाळता. यामुळे वजन कमी होण्यासही मदत होते.

**डोळ्यांसाठी फायदेशीर–**

उकडलेल्या कॉर्नमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. डोळ्यांच्या समस्या दूर करण्यासाठी अँटी-ऑक्सिडंट उपयुक्त आहे. याच्या सेवनाने दृष्टी सुधारते.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, १५ एप्रिल ते २१ एप्रिल २०२५

# संपादकीय

# उद्याचे भविष्य कबरीत बंद करू नका!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक




**सध्या विविध माध्यमांतून बातम्यांचा भडिमार सुरू आहे. त्यात राजकीय आरोप-प्रत्यारोप आणि गुन्हेगारीच्या बातम्यांचा तर सुकाळच आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोप तर निर्लज्जपणाचा कळस आहे. त्यामुळे आता सर्वसामान्य त्याकडे दुर्लक्षच करतात. पण सर्वात चिंताजनक आहे ती, गुन्हेगारी. नातेसंबंधांना तडा देणाऱ्या तसेच तरुण पिढी चुकीच्या मार्गाने जात असल्याचे दर्शविर्णाया या घटना आहेत. हे थांबणार की नाही? की पुढच्या काळात हा प्रश्न आणखी गंभीर होणार? काही सांगता येणार नाही. पण याबद्दल प्रत्येकाने आत्मचिंतन करण्याची गरज आहे.**

मार्च महिन्याच्या अखेरीला राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनाचे सूप वाजले. त्यात सर्वसामान्यांच्या हाती काय लागले? हा भाग अलहिदा. पण एक धक्कादायक वास्तव त्यानिमित्ताने समोर आले आहे. अलीकडच्या काळात पुण्यात कोयता गँगने हैदोस घातल्याच्या बातम्या वारंवार येत आहेत. कोयता गँगने एखाद्या तरुणावर, दुकानदारावर केलेले हल्ले हा सातत्याने चर्चेचा विषय ठरला. या हल्ल्यांमुळे विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जार्णाया सुसंस्कृत पुण्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, अशी कोणतीही कोयता गँग अस्तित्वातच नसल्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्पष्ट केले. मग कोयता हाती घेऊन राजरोसपणे धुडगूस घालणारे कोण आहेत? असा प्रश्न येतो. त्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जो खुलासा केला आहे, तो केवळ अचंबित करणारा नसून विचार करायला लावणाराही आहे. पुणे शहर परिसरात अशा प्रकारची कोणतीही कोयता गँग अथवा कोयत्याचा वापर करून संघटित गुन्हेगारी करणारी टोळी अस्तित्वात नाही. केवळ, आपल्या 'एरियाचा भाई' होण्याच्या आकर्षणापोटी काही अल्पवयीन मुले कोयत्याचा वापर करून दहशत माजवत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पुणे शहरात कोयता हातात घेऊन कायदा आणि सुव्यवस्था बिघडवर्णाया गुन्हेगारीच्या ९ घटना घडलेल्या आहेत. यामध्ये १९ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी १३ आरोपी विधिसंघर्षग्रस्त बालके (बालगुन्हेगार) असल्याची माहितीही त्यांनी दिली.

मात्र, हा प्रश्न फक्त पुण्यापुरता मर्यादित नाही तर, सोलापुरच्या समोर आलेल्या आकडेवारीवरून हेच दिसते. गेल्या तीन वर्षांत सोलापूर शहर पोलिसांनी १६२ तर ग्रामीण पोलिसांनी २९५ जणांना तडीपार केले आहे. त्यात ७५ टक्के गुन्हेगार ४० वर्षे वयापर्यंतचे आहेत. शहर पोलिसांनी २०२४-२५ मध्ये ८३ जणांना जिल्ह्यातून हद्दपार केले. त्यामध्ये १८ ते २५ वयोगटातील २० जण तर, २६ ते ३५ वयोगटातील ३९ तरुण होते. ग्रामीण पोलिसांनी २०२४-२५ मध्ये २०१ तर 2023-24 मध्ये 94 जणांना तडीपार केले असून त्यातील 172 गुन्हेगार 35 वर्षे वयाच्या आतील होते.

ही नवी पिढी केवळ मद्य नव्हे तर, ड्रग्जच्या विळख्यात अडकत आहे. पुण्यातील एफसी रोडवरील एका प्रसिद्ध हॉटेलमध्ये अल्पवयीन मुले ड्रग्जचे सेवन करत असल्याचा व्हिडीओ समोर आला होता. त्यापाठोपाठ पुणे-नगर रस्त्यावरील एका मॉलमध्ये दोन तरुणी ड्रग्ज घेत असल्याचा व्हिडीओही व्हायरल झाला. देशात टनावारी ड्रग्ज बाहेरून येत आहे. त्यातील काही पकडले जाते, पण काही या तरुणाईपर्यंत पोहोचवले जाते. वाहनांची तोडफोड करण्याच्या घटनांमध्ये किंवा अन्य घटनांमध्ये लहान मुलांचा काही लोकांकडून वापर केला जातो. त्यांना अमली पदार्थांचे व्यसन लावून त्यांच्याकडून काही गुन्हे करवून घेतले जातात, असे दस्तुरखुद्द गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. असे का घडते आहे? याची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सोशल मीडियाचा प्रभाव, हे एक कारण म्हणता येईल. कोरोना महामारीने लहान मुलांच्या हातीदेखील मोबाईल दिले. पाल्यांच्या शिक्षणाचे घोडे अडू नये, यासाठी पालकांनीदेखील त्यांची ही गरज कशीबशी भागवली, पण मुलांच्या हाती तेव्हा जो मोबाईल आला, तो हातातून सुटलाच नाही. विज्ञानाच्या प्रगतीला कोणी नाकारू शकणार नाही, पण ती कशाप्रकारे आणि किती स्वीकारायची हे मात्र आपल्या हाती आहे.


सोशल मीडियाच्या जंजाळात आपलेपणाचा ओलावाही नष्ट होत असून नात्यात एकप्रकारे शुष्कपणा येत चालला आहे. सोशल मीडिया हे अतिशय प्रभावी माध्यम आहे, पण त्याच्या आहारी बहुतांश जण गेले आहेत, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सोशल मीडियाने जगाच्या या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत सर्वांना कनेक्ट केले, पण घरातल्यांना, आसपासच्यांना, मित्रांना अजून कनेक्ट केलेले नाही. प्रत्येक जण आपल्या हातातील मोबाईलमध्ये मान खुपसून बसलेला असतो. शेजारी बसलेल्या आप्त-मित्रापेक्षा दुसरीकडे कुठेतरी असलेला मित्र, मैत्रीण, आप्त याच्याशी त्याचा संवाद सुरू असतो. बहुधा यातूनच दिखाऊपणा निर्माण होत असावा. याच दिखाऊपणाला नवी पिढी भुलत असावी आणि त्यातूनच अपेक्षाभंग पदरी पडत असावा.

मधल्या काळात 'लाफ्टर क्लब'चा ट्रेंड आला होता. त्यावेळी प्रसिद्ध नाटककार शफाअत खान यांचे एक सुंदर वाक्य वाचनात आले होते. आजकाल लोक 'लाफ्टर क्लब'मध्ये जाताना दिसतात. याचाच अर्थ आता जीवनात निखळ हास्याचे क्षण यायचे कमी झाले आहेत. म्हणूनच हास्य क्लबची गरज भासू लागली आहे का, अशा आशयाचे ते वाक्य होते. आता तो ट्रेंड गेला असला तरी, परिस्थिती आणखी बिकट झाली आहे, असे वाटते. याचा खरोखरीच शांतपणे आणि गांभीर्याने सर्वांनीच विचार करण्याची गरज आहे. सोशल मीडियावरील जग हे आभासी आहे आणि त्याच्या प्रेमात अनेकजण पडले आहेत. त्याचा फोलपणा सर्वांनाच माहीत आहे, पण तो मान्य करायला अनेकजण तयार नाहीत. परिणामी, संवेदनशीलपणा, सहनशीलता, सोशिकपणा कमी होत चालला आहे, असे दिसते. कौटुंबिक न्यायालयाची आकडेवारी हेच दर्शवते. कौटुंबिक न्यायालयाच्या आकडेवारीनुसार ३० टक्के घटस्फोट हे केवळ सोशल मीडियाच्या वापरामुळे निर्माण झालेल्या वादातून होत आहेत. व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम, फेसबुकवर तासनतास होणारी चॅटिंग नवरा-बायकोच्या नात्यांवर संक्रांत आणत आहे. यामुळे होणारे भांडण हे थेट घटस्फोटाला कारण ठरत आहेत. तरुणांची एवढीच कथा नाही तर, गुन्हेगारी वृत्ती नातेसंबंधांवरही परिणाम करत आहे. विवाहबंधनात अडकल्यावर नव्या आयुष्याची स्वप्ने पाहात असतानाच तो किंवा ती जोडीदाराच्या जीवावर उठल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. जोडीदाराला संपवतानाच आपल्या आयुष्याचीसुद्धा राखरांगोळी होणार आहे, याचे भान त्यांना राहात नाही. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, सध्या रोज अशी एकतरी बातमी वाचायला मिळतेच.

तसेच, ओटीटी प्लॅटफॉर्मवरील बेलगाम वेबसीरिज, हेदेखील प्रमुख कारण असावे असे वाटते. या वेबसीरिजवर कोणतेही निर्बंध नसल्याने अनेक वेबसीरिजच्या विषयापासून भाषेपर्यंत सर्वकाही आक्षेपार्हच आहे. त्याचेच अनुकरण करण्याचा प्रयत्न ही तरुणाई करत असावी. कारण सध्या त्यांच्यासमोर दुसरे काय आदर्श आहेत. या मुलांवर ज्यांचा प्रभाव असतो, त्या बॉलीवूडमधील सिनेतारे-तारकादेखील ड्रग्जच्या अमलाखाली आहेत, हे सिनेअभिनेता सुशांतसिंह राजपूत याच्या आत्महत्येच्या निमित्ताने स्पष्ट झाले. नव्या पिढीसाठी इतिहास हा अभ्यासापुरताच असतो आणि सध्या तर तो राजकारणासाठी वापरला जातो. महापुरुषांचा वारंवार अवमान करण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. त्यातच 'भावना दुखावणे' हा प्रकारही वाढीस लागला आहे. मुघल सम्राट औरंगजेबाच्या कबरीवरून अलीकडेच जे काही राजकारण झाले, ते पाहून उद्विग्नताच जास्त आली. सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे, 'औरंगजेब हा खलनायकच होता,' असे होते तर, मग त्यावरून राज्यातील वातावरण बिघडवण्याची काय गरज होती? इतिहासातील गाडलेल्या अशा अनावश्यक विषयांना हवा देण्यापेक्षा हाताबाहेर जात असलेल्या नव्या पिढीला आवरण्याची गरज आहे. याचे भान राजकारण्यांना कधी येणार? आपलेच उखळ पांढरे करण्यात मग्न असलेल्या राजकारण्यांकडून फार अपेक्षा ठेवता येणार नाहीत.

नव्या पिढीने अशा जीवन उद्ध्वस्त करर्णाया जाळ्यात अडकू नये. तसेच, त्यांना सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी पालकांप्रमाणेच तुम्ही-आम्ही मिळून बनलेल्या समाजाचीदेखील आहे. राजकारणी आपल्या पिढ्या कशा प्रकारे सुरक्षित करत आहेत, हे विविध निवडणुकांसाठी जाहीर होणाऱ्या उमेदवार याद्यांवरून तसेच त्यासाठी देण्यात येणाऱ्या प्रतिज्ञापत्रावरून स्पष्टपणे दिसत आहे. तरुणाईला चुकीचा मार्ग आपलासा वाटत आहे, हे स्पष्ट होत आहे. त्यासाठी आपल्यालाच पुढे यावे लागेल, तेव्हाच युवकांच्या डोक्यातील 'भाईगिरी'चे खुळ काढावे लागेल. पण त्याआधी सोशल मीडियाच्या भुलभुलैयातून बाहेर येत नात्यातील ओलावादेखील जपावा लागेल.

# बोटीच्या बुडाचे भगदाड



आपल्यासाठी आता चिनी आयातीवर लक्ष ठेवणे आले. हे लक्ष ठेवणे म्हणजे त्या उत्पादनांस रोखणे. ते तसे करणे म्हणजे चीनने भारतीय उत्पादनांना रोखणे... आपण अनेक अमेरिकी उत्पादनांवरील कर कमी केले म्हणून ट्रम्प यांनी आपणास चीनच्या तुलनेत 'स्वस्तात घेतले'; पण हे समाधान कितपत टिकेल?

'आपल्या' देशास गंभीर समस्येने ग्रासलेले असून या समस्येवरील तोडगा फक्त मी आणि मीच देऊ शकतो ही कोणत्याही आत्ममग्न नेत्यांची धारणा. मग तो कोणत्याही देशातील असो आणि त्याच्या देशासमोर खरोखरच समस्या असो वा नसो. एकदा का बहुसंख्यांच्या डोक्यात ही कथित समस्या आणि तिची निराकरण क्षमता या मुद्द्यांची प्राणप्रतिष्ठा करवली की संबंधित नेत्यास रान मोकळे मिळते. हे वास्तव. मग फक्त देश बदलतात आणि हे वास्तव तेच राहते. या देशांत कधी रशिया असतो तर कधी चलनवाढ ३८ टक्क्यांवर गेलेला तुर्कीये! या अशा देशांच्या मालिकेत हे वास्तव सहन करण्याची वेळ गेल्या काही शतकांत अमेरिकेवर पहिल्यांदाच आलेली असून डोनाल्ड ट्रम्प यांनी नव्या 'स्वातंत्र्यदिनी' जाहीर केलेले नवे वाढीव आयात कर हे या वास्तवाचा प्रत्यक्ष आविष्कार. या नव्या कराची घोषणा त्यांनी २ एप्रिल रोजी केली. त्यांच्या मते अमेरिका त्या दिवसापासून एकतर्फी परकीय व्यापाराच्या जोखडातून मुक्त होणार असल्याने तो अमेरिकेचा नवा स्वातंत्र्य दिन! त्यातूनही या अशा आत्ममग्न नेत्यांचे साधर्म्य लक्षात यावे. त्यांचे म्हणणे असे की जगातील सर्व देश अमेरिकेच्या व्यापार सहिष्णुतेचा गैरफायदा घेत असून त्यामुळे अमेरिकेस नुकसान सहन करावे लागते. या नव्या स्वातंत्र्य दिनापासून हे नुकसान बंद! छान. हा अन्यायगंड, त्याचे जगावर आणि आपल्यावर होणारे परिणाम इत्यादींवर भाष्य करण्याआधी ट्रम्प यांचा हा नुकसान-न्यूनगंड समजून घ्यायला हवा.

अमेरिकेतून जगभरात जितकी निर्यात होते त्यापेक्षा किती तरी अधिक आयात जगातील अनेक देशांतून अमेरिकेत होते. यातील तफावत गतसाली १ लाख २० हजार कोटी डॉलर्स (१.२ ट्रिलियन) इतकी नोंदली गेली. ही व्यापार तूट. ट्रम्प यांच्या मते हे अमेरिकेचे नुकसान. हे झाले वस्तूंबाबत. पण या रकमेच्या किमान दुप्पट निर्यात अमेरिकेतील सेवांमार्गे (सर्व्हिसेस) होते. मग भारत असो वा अन्य एखादा देश. या सर्व देशांस अमेरिकी कंपन्यांकडून मिळणाऱ्या सेवांचे मूल्य यापेक्षा अधिक आहे. म्हणजे वास्तव असे की या मुद्द्यावर सर्व देश तूट अनुभवतात. त्यामुळे मुदलात ट्रम्पोजींच्या आयात कराच्या निर्णयाचा पायाच असा भुसभुशीत ठरतो. हे म्हणजे एखादा गवळी गावच्या धनाढ्याकडे दररोज दुधाचा रतीब घालत असेल तर त्या धनाढ्याने त्या दुग्धव्यावसायिकास ''आम्ही तुझे उत्पादन घेतो, तू आमचे काही खरेदी करत नाहीस'' असे खडसावत त्यावर कर लावण्याइतके मूर्खपणाचे. तथापि एकदा तर्क आणि शहाणपण यालाच तिलांजली द्यावयाची असे ठरवले की आणि बहुसंख्यांच्या गळी हा वेडाचार उतरवण्याचा आत्मविश्वास असला की असले आचरट निर्णय घेता येतात. तसा तो ट्रम्प यांनी अखेर घेतला. त्यानुसार अमेरिकेत उत्पादने विकणाऱ्या प्रत्येक देशास किमान १० टक्के आयात शुल्काचा भार सहन करावा लागेल. या करांची आकारणी ५ एप्रिलपासून होईल. त्याउपर प्रत्येक देशाच्या आयात कराच्या तोडीसतोड (रेसिप्रोकल) कर अमेरिकाही आकारेल. त्याची अंमलबजावणी या आठवड्यात ९ एप्रिलपासून होईल. त्यानुसार अमेरिकेचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार असलेल्या युरोपीय देशांवर २० टक्के कर लावला जाईल आणि भारतावर २७ टक्के. चिनी उत्पादनांवर आताच अमेरिकेत २० टक्के आयात कर आहे. त्यावर ३४ टक्क्यांची नवी आकारणी. म्हणजे अमेरिकेत चिनी उत्पादनांवरील एकूण कर ५४ टक्के इतके होतील. आता यावरही चीनपेक्षा आपल्याला बसणारा फटका कमी आहे यात आनंद मानण्याचा पर्याय अनेकांस आहे आणि आपली एकंदर सामायिक समज लक्षात घेता तो स्वीकारणारेही बहुसंख्य असतील. या अशांचा हा आनंदाधिकार हिरावून घेण्याचा अधिकार अन्यांस नाही हे मान्य करूनही काही बाबी नमूद करायला हव्यात.

कारण पुराचे पाणी सर्व बंध सोडून जेव्हा गावात शिरते तेव्हा एखादा कितीही उंचवट्यावर असला तरी आपले घर कोरडे राहिले यात समाधान मानू शकत नाही. जागतिक बाजारात जेव्हा अमेरिकेसारखा देश इतका हास्यास्पद विचार करून अनपढ निर्णय घेतो तेव्हा त्याचे परिणाम सर्व जगाला सहन करावे लागतातच लागतात. अमेरिकेच्या या निर्णयास प्रत्युत्तर म्हणून चीनने लगेच अमेरिकी आयातीवर ३५ टक्के कर आकारणीचा निर्णय जाहीर केला. म्हणजे हे दोन देश आता व्यापार युद्धात एकमेकांस जायबंदी करणार. वस्तू आणि सेवा यांत हे दोनही देश जगात आघाडीवर आहेत आणि ते अर्थव्यवस्थेच्या रेलगाडीची दोन इंजिने आहेत. त्यांचा वेग मंदावल्यावर मागील मालगाडीही लुडकणार हे सांगण्यास तज्ज्ञांची गरज नाही. याचे दोन थेट परिणाम. एक म्हणजे आता चिनी उत्पादनांना अन्य देशांत पाय फुटणार. या अन्य देशांत आपण अर्थातच आघाडीवर. त्यामुळे आता चिनी आयातीवर लक्ष ठेवणे आले. हे लक्ष ठेवणे म्हणजे त्या उत्पादनांस रोखणे. ते तसे करणे म्हणजे चीनने भारतीय उत्पादनांना रोखणे. या मुद्द्यावर आधीच आपली बोंब. चीन आणि आपण यांतील व्यापारी तफावत आताच ८५०० कोटी डॉलर्स (८५ बिलियन डॉलर्स) इतकी महाप्रचंड आहे. आपण कितीही लागोचा शड्डू ठोकले तरी ती भरून काढता येणे अशक्य. दुसरा मुद्दा अमेरिकेने आपल्यावर इतरांच्या तुलनेत लावलेल्या 'स्वस्त' करांचा. त्याचा फायदा घ्यावयाचा असेल तर आपणास आपल्या उत्पादन क्षमतेत प्रचंड वाढ करावी लागणार. ती लगेच होणारी गोष्ट नाही. दुसरे असे की या उत्पादनांस अमेरिकेत मुळात मागणी असायला हवी. तिसरी बाब अशी की ट्रम्प यांनी नव्याने लावलेले आयात कर हे प्रत्युत्तर आहे. गेल्या काही महिन्यांत आपण अनेक अमेरिकी उत्पादनांवरील कर कमी केले म्हणून ट्रम्प यांनी आपणास चीनच्या तुलनेत 'स्वस्तात घेतले'. याचे दोन अर्थ. एक म्हणजे भारत जे करू शकला ते अन्य देशही करू शकतील आणि आपापल्या देशांवरील कर कमी करवून घेऊ शकतील. म्हणजे हे स्वस्तात घेतल्याचे फायदे आपणास दीर्घकाळ मिळतीलच असे नाही.

तथापि याची दुसरी बाजू अशी की अमेरिकेच्या 'अरे'ला तितक्याच मोठ्या आवाजात 'कारे' करण्याची हिंमत तरी चीनने दाखवली. ती सोय आपणास नाही. त्यामुळे या ट्रम्पी अमेरिकी सुसरबाईची पाठ कितीही टोचणारी असली तरी ती किती मऊ, मुलायम आहे अशी स्तुती करत राहण्यावाचून आपणास दुसरा पर्याय नाही. त्यात अमेरिकेशी तातडीने सुरू झालेली आपली व्यापारी चर्चा अद्याप पूर्ण झालेली नाही. तीत ट्रम्प आपणास आणखी चेपणार हे दिसतेच आहे. असे झाले तर अमेरिकेने 'स्वस्तात' सोडल्याचे फायदे आपण किती आणि किती काळ घेऊ शकणार? आपले सत्ताशरण भारतीय उद्योगविश्व खेळात जखमी झालेल्या बनेल मुलासारखे ''छे... मला कुठे काय लागले'' असा बहाणा भले करो. पण ही आर्थिक जायबंदता फार काळ लपवता येणार नाही. ते का, याचे उत्तर विख्यात अमेरिकी अर्थवेत्ते मिल्टन फ्रीडमन यांनीच देऊन ठेवलेले आहे.

''खोल समुद्रात एखाद्या प्रवाशाने बोटीच्या बुडास छिद्र पाडले याचा राग येऊन अन्य प्रवाशांनीही तसेच केल्यास जे होईल तेच देशांतर्गत बाजार सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने आयात कर आकारण्याच्या स्पर्धेतून अर्थव्यवस्थेचे होईल'', हे मिल्टन यांचे विधान त्यांच्याच देशाचा अध्यक्ष सिद्ध करू पाहतो. अर्थव्यवस्थेच्या बोटीचे हे भगदाड आता बुजवता येईल?

# कृषी कर्जमाफीची दुसरी बाजू !

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीविषयी केलेल्या विधानामुळे राजकीय गदारोळ उठला आहे. कर्ज घेता आणि पाच-दहा वर्षे कर्जमाफीची वाट पाहता, कर्जमाफी झाल्यावर त्याच पैशातून लग्ने, समारंभाचा खर्च करता, असे वक्तव्य माणिकराव कोकाटेंनी केले होते. या वक्तव्यावर जोरदार टीका झाल्यावर त्यांनी शेतकऱ्यांची माफीही मागितली, शेतकऱ्यांच्या मानसन्मान दुखावला गेल्यास मी माफी मागतो असे ते म्हणाले. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या राज्यभरातील राजकारणावर शेतकऱ्यांचा प्रभाव मोठा आहे. त्यामुळे कदाचित राजकीय दबावातून जनमत विरोधात जाऊ नये, म्हणून कोकाटेंनी शेतकऱ्यांची माफी मागितली असावी, हे जरी गृहीत धरले तरी त्यांनी मांडलेल्या मुद्यांचाही विचार व्हायला हवा. आर्थिक, नैसर्गिक संकटात शेतर्कयांना मदत मिळायलाच हवी, याविषयी दुमत असण्याचे काही कारण नाही. परंतु केवळ प्रतिष्ठा जपण्यासाठी मोठमोठी खर्चिक लग्नेकार्ये करणे, लग्नापेक्षा जास्त खर्च हळदी समारंभात करणे, समाज आणि भावकीमध्ये मोठेपणा मिरवण्यासाठी प्रसंगी कर्जे काढून दिखाऊ लग्न, घरगुती समारंभ, उत्सव साजरे करण्याचे प्रकार महाराष्ट्रात होत नाहीत का, याचीही विचार व्हायला हवा. ठाणे ग्रामीण भागातही हळदी समारंभात लग्नासारखाचा मोठा खर्च होण्याचे प्रमाण वाढले होते. त्यावरून समाजातील काही सूज्ञ मंडळींनी एकत्र येऊन अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रयत्न सुरू केले, त्याला आज यश मिळत आहे. मराठवाडा, विदर्भातही केवळ घराण्याच्या प्रतिष्ठेसाठी घरगुती कार्य, लग्नात खर्च करण्याची स्पर्धा सुरू असल्याचे दिसते. कर्ज काढून, डीजे, जेवणावळी, मानपान, दागदागिन्यांसाठी मोठा खर्च केला जातो, जे सधन आणि गडगंज श्रीमंत आहेत, त्यांना हे शक्य होते. परंतु त्यांच्यासमोर आपली 'प्रतिष्ठा' जपण्यासाठी सर्वसामान्य लोकही प्रसंगी मोठी कर्जे काढतात. लग्नकार्य उरकल्यावर पाहुणे, नातेवाईक, मित्रमंडळी निघून गेल्यावर झालेल्या कर्जाचा भार वर किंवा विधूपिता आणि ज्यांचे लग्न झाले आहे त्या वधूवरांच्या खांद्यावर येतो. यात मुलीच्या लग्नासाठी खर्च करणाऱ्या पित्याची आर्थिक कुचंबणा मोठी असते. आपल्या मुलीला सासरी त्रास होऊ नये किंवा तिची सामाजिक, कौटुंबिक प्रतिष्ठा जपली जावी यासाठी अनेकदा वधूपिता नाईलाजाने असा खर्च करायला तयार होतो. मात्र यातून जे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न निर्माण होतात, ज्या विवंचनेत कुटुंब भरडले जाते, हा मोठा सामाजिक मुद्दा आहे. जनजागृती किंवा कायद्याच्या धाकामुळे थेट हुंडा देण्याची पद्धत कमी होणे स्वागतार्ह आहे, मात्र कौटुंबिक कार्यात होणाऱ्या अवास्तव खर्चाबाबतही अशाच जनजागृतीची गरज आहे. ग्रामीण भागात अजूनही शेती हेच आर्थिक उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्यांना सरकारी मदत, अनुदानाची गरज दरवर्षी भासते. अवकाळी, पूर, दुष्काळातून पीक वाचवण्याची कसरत शेतकऱ्याला दरवर्षी करावी लागते, तसेच दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात रब्बी पिकांवर अवकाळीचे संकट असते. खरीपाच्या हंगामावरही अतिवृष्टीचे संकट असतेच, पीकविम्याचा दिलासा शेतकऱ्यांसाठी पुरेसा नसतो. यातूनही उत्तम पीक आल्यावर हमीभाव, साठवणूक, गोदाम, शेतमजुरांची कमतरता अशी आव्हाने असतातच, यात शेतकरी भरडला जातो. त्यामुळे माणिकराव कोकाटे यांनी केलेल्या विधानाचा राजकीय अर्थ बाजूला ठेवून त्याचा सामाजिक दृष्टिकोनातून विचार व्हायला हवा. आपल्याकडे आर्थिक साक्षरतेचा विषय नावालाही नाहीच, तर हिशेबी किंवा आर्थिक नियोजनाचा विचार करून भविष्याची तरतूद करणाऱ्यांकडे कुत्सितपणे पाहिले जाते. कर्जमाफीची रक्कम उपलब्ध करण्यामागे शेतीव्यवसाय जगवण्याचा उद्देश असतो, त्यामुळे तो खर्च इतर ठिकाणी वळवण्यात येऊ नये, असे कोकाटेंनी सुचवले असल्यास या सल्ल्याचे राजकारण करून त्याला तातडीने शेतकरी विरोधी ठरवून विरोध करण्याची गरज नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात उद्देश, हेतू न तपासता केवळ विधाने, वक्तव्ये पकडून त्याला समाजमाध्यमांवर पसरवले जाते. त्यातून राजकीय टीकाटिप्पणी करण्याचे प्रकार वाढले आहेत. या परिस्थितीला बेछूट बेताल विधाने करणारेही जबाबदार आहेतच, यात शंका नाही, परंतु प्रत्येक विधानाचे राजकारण करू नये. त्यात पुन्हा कर्जमाफी ही सरसकट दिली जाते. अल्पभूधारक गरीब शेतकऱ्याला कर्जमाफी मिळावी, पण जे बडे शेतकरी आहेत, त्यांना त्याची खरंच गरज आहे का, याचाही विचार व्हायला हवा. अवकाळीनंतर राज्यात पुन्हा उन्हाच्या झळा सुरू झाल्या आहेत. राज्यातील मराठवाडा, विदर्भात पाणीटंचाई हळूहळू तीव्र होत आहे. रब्बी हंगामातील आंबा, फळबागा आणि भाजीपाल्याला त्याचा मोठा फटका बसला आहे. मराठवाडा, विदर्भात फळे आणि भाजीपाला पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. गारपीट झाल्याने हातातोंडाशी आलेली पिके मातीमोल झाली आहेत. अशा परिस्थितीत गारपीट, अवकाळीचा धोका अद्याप टळलेला नाही. गहू, हरभरा, ज्वारी तसेच आंबा, द्राक्षे, संत्री आणि केळी पिकांच्या नुकसानाचे पंचनामे केले जात आहेत. खरीप हंगामासाठी शेतकऱ्याला पुन्हा पेरणीसाठी उभे करणे गरजेचे आहे, त्यासाठी शेतर्कयांनी अवास्तव खर्च टाळायला हवा. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या विधानाचा सकारात्मक अर्थ घेणे शेतकऱ्यांच्या आणि राज्याच्याही हिताचे आहे.

# अध्यक्षपदासाठी भाजपची शोधाशोध

## आगामी निवडणुकांसाठी महामंडळांवर लवकरच तरुणाची नियुक्ती



**■ठाणे** : भाजपने आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात आक्रमक रणनीती उभारण्यास सुरुवात केली आहे. स्वबळावर महापालिका निवडणूक लढवण्याचा निर्धार स्पष्ट केल्यानंतर भाजपने तरुण कार्यकर्त्यांवर विश्वास दाखवला आहे. महापालिका निवडणुकांची तारीख ठरली नसली तरी शहरात पक्षाची फेरमांडणी करण्यासाठी तरुणांची फळी तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. शहर अध्यक्षही ४५ ते ५० वयोगटातील मंडळ अध्यक्षाबरोबर आता शहर अध्यक्ष देखील ४५ ते ५० वयोगटातील असावा याबाबत चर्चा सुरू झाली असून तसे झाल्यास पक्षातील नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार आहे. तसेच आता भाजपमधील प्रत्येक माजी नगरसेवक आपले वय तपासू लागला असून आपण त्यात बसतो का? याची चाचपणी करू लागला आहे. परंतु जे या वयात बसणार नाहीत, ते आपोआपच शहर अध्यक्ष पदाच्या रेसमधून बाहेर फेकले जाणार आहेत. ठाण्यात येत्या काही दिवसांत २० मंडळाच्या अध्यक्षपदासाठी तरुणांची नियुक्ती करण्यावर भाजपने भर दिला आहे. त्यातही हे तरुण ३५ ते ४५ वयोगटातील असतील, असेही भाजपच्या श्रेष्ठींनी स्पष्ट केले आहे. या तरुणफळीचा सर्वे सुरू करण्यात आला असून, येत्या काही दिवसांत त्यांची नियुक्ती केली जाणार असल्यामुळे तरुण अध्यक्षांसाठी शोधाशोध सुरू केले आहे. भाजपचे ठाण्यात ३० मंडळ अध्यक्ष होते, परंतु आता ती संख्या २० वर आणण्यात आली आहे. यापूर्वी मंडळ अध्यक्षांना दोन दोन प्रभाग साभांळावे लागत असल्यामुळे त्यांची कसरत होत होती. परंतु आता एक एका प्रभागाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात येणार आहे. यामुळे त्यांच्या कामाचा ताणही कमी होणार आहे. परंतु आता तरुण मंडळ अध्यक्ष येणार असल्याने त्यांच्या माध्यमातून प्रभागातील तरुणांपर्यंत जाण्याबरोबर भाजपचे ध्येय धोरण आणि केलेली विकासकामे हे पोहचविण्याचे महत्त्वाचे काम त्यांना करावे लागणार आहे. येत्या काही दिवसांत तरुण मंडळ अध्यक्षांची फळी उभी केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. भाजपने पालिकेत भाजपचा झेंडा फडकविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

**पुढील महापौर हा भाजपचाच**

ठाण्यात भाजपने 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. त्यात भाजपचे आमदार संजय केळकर पुढील महापौर हा भाजपचाच असेल, असा दावा केला आहे. त्यानुसार आता भाजपने पक्षबांधणी सुरू केली असून सदस्य नोंदणीत देखील ठाण्यात भाजपने मोठी उडी घेतल्याचे दिसून आले आहे. त्यानंतर आता तरुण मतदारापर्यंत पोहचण्यासाठी आता तरुण कार्यकर्त्यांची फळी उभी केली जात आहे. त्याची आखणी देखील करण्यात आली असून यापुढील मंडळ अध्यक्ष हे ३५ ते ४५ वयोगटातीलच असतील, असा भाजपचे श्रेष्ठींनी स्पष्ट केले आहे. त्यानुसार आता पक्षातील, अशा भावी मंडळ अध्यक्षांचा सर्व्हे भाजपच्या श्रेष्ठींनी सुरू केला आहे.


# मुंबई पोलिसांच्या सायबर प्रयोगशाळेसह विविध उपक्रमांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण



**■अंबरनाथ** : मुंबईः सायबर प्रयोगशाळेसह मुंबई पोलिसांच्या विविध उपक्रमांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी लोकार्पण करण्यात आले. भविष्यात सायबर गुन्हे रोखणे व सायबर गुन्हेगारांना पकडण्याचे मोठ्या आव्हान आहे. मुंबई पोलीस ते आव्हान पेलण्यासाठी सज्ज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. आझाद मैदान येथील उत्कर्ष सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मुंबईतील सर्वच पोलीस ठाण्यांमध्ये महिला, तसेच नागरिक केंद्रीत सोयी - सुविधांची उभारणी करण्यात आली असून पोलीस ठाणी अधिकाधिक लोकाभीमूख झाली असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुंबई पोलिसांना अद्ययावत पोलीस प्रयोगशाळा मिळाली असली, तरी वाढते सायबर गुन्हे रोखण्यासाठी मुंबई पोलिसांच्या सायबर विभागात तुलनेने अपुरे मनुष्यबळ आहे. सायबर विभागाचे उपायुक्त पद गेल्या दोन वर्षांपासून रिक्त आहे. गुन्हे प्रकटीकरण विभागाच्या उपायुक्तांना सायबर विभागाचा अतिरिक्त भार देण्यात आला आहे. याशिवाय इतर ठिकाणीही अपुरे संख्याबळ आहे. तसेच सायबर विभागात काम करण्यासाठी अनेक वरिष्ठ अधिकारी व कनिष्ठ अधिकारी उत्साही नसतात, अशी चर्चा पोलीस दलात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डी. बी मार्ग येथील दक्षिण मुंबई विभागाच्या निर्भया सायबर प्रयोग शाळेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी वरळी व गोवंडी येथीलही सायबर प्रयोगशाळांचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. मुंबईत सध्या दक्षिण, पूर्व, पश्चिम, मध्य व उत्तर अशा पाच सायबर पोलीस ठाण्यामध्ये पाच सायबर प्रयोगशाळा प्रस्तावित आहेत. यापैकी तीन प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या प्रयोगशाळांच्या माध्यमातून विशेषत्वाने सायबरच्या माध्यमातून महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे गुन्हे कमी कालावधीत सिद्ध करता येणार आहे. तसेच गुन्हा लपवण्यासाठी किंवा पुरावा नष्ट करण्यासाठी कुठल्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणातील डाटा डिलीट केल्यास, मोबाइलची तोडफोड केल्यास किंवा मोबाइल टेम्पर केल्यास अशा सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधील सर्व डाटा आधुनिक संगणक प्रणालीच्या सहाय्याने पुन्हा मिळवणे शक्य होणार आहे. या प्रयोगशाळा आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून अद्ययावत संगणक प्रणालीने (सॉफ्टवेअर) सक्षम आहेत. आर्थिक गुन्हेगारी संदर्भात ऑनलाइन पद्धतीने पैशांची हेराफेरी, बँक खाते हॅक करणे अशा पद्धतीच्या गुन्ह्यांवरही प्रयोगशाळेच्या माध्यमातून नियंत्रण मिळविण्यात येणार आहे. सायबर गुन्हे रोखण्यासाठी तीन अत्याधुनिक सायबर प्लॅरयोगशाळा उभारण्यात आल्या आहेत. या प्रयोगशाळांचे सोमवारी लोकार्पण करण्यात आले. याशिवाय पोलीस ठाण्यांमध्ये महिला व बाल सहाय्यता कक्ष स्थापन करण्यात आले आहे. त्याशिवाय पार्क साईट पोलीस ठाण्याची नूतन इमारत, आझाद मैदान येथील उत्कर्ष सभागृहाचे लोकार्पण यावेळी करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस आणि गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या उपस्थितीत पोलिसांच्या नवीन मोटर सायकल, अद्ययावत, फॉरेन्सिक लॅब व्हॅन, निर्भया पथकाच्या व्हॅन यांना हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आल्या. तसेच मुंबईतील ८७ पोलीस ठाण्यांतील महिला व बाल सहाय्यता कक्ष, २१६ पोलीस ठाणी व उपायुक्त कार्यालयांमध्ये उभारण्यात आलेली दूरदृष्य प्रणाली यंत्रणा, पोलीस विभागाचे एक्स हॅन्डल यांचे लोकार्पण, मिशन कर्मयोगी माहिती पुस्तिकेचे प्रकाशन व मिशनचे कार्यन्वयन, पोलीस प्रशिक्षण कार्यान्वित करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यानी पार्क साईट पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांशी संवाद साधून नूतन इमारतीबद्दल त्यांना शुभेच्छा दिल्या.

### धाराशिवमध्ये शिष्यवृत्ती परीक्षेत सामूहिक कॉपी?

## एकाच केंद्रावरील ७८ विद्यार्थ्यांना समान गुण



**शिष्यवृत्ती परीक्षेत मास कॉपी?**
- धाराशिवमध्ये ६५३ विद्यार्थ्यांनी दिलेली परीक्षा
- एका केंद्रावर ७८ विद्यार्थ्यांना एकसमान गुण
- २१५ पात्र विद्यार्थ्यांपैकी १२५ एकाच केंद्राचे
- शिक्षण विभागाने सखोल चौकशी करण्याची मागणी

**■धाराशिव** : धाराशिवमध्ये शिष्यवृत्तीच्या परीक्षेतच सामूहिक कॉपी करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. अनेक विद्यार्थ्यांना एकसमान गुण मिळाल्यामुळे यात संशय आला. एकाच परीक्षा केंद्रावरील मुलांना एकसमान गुण मिळालेत. त्यामुळे शिष्यवृत्तीच्या परीक्षेतच सामूहिक कॉपी झाल्यानं मोठी खळबळ उडाली आहे.

सरकार राज्यभरात कॉपीमुक्त अभियानाचा डंका वाजवत असतानाच या मोहिमेला सपशेल अपयश आलं आहे. केंद्र सरकारच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत धाराशिवमध्ये मास कॉपी झाल्याचा आरोप होतोय. २१५ पैकी १२५ विद्यार्थी एकाच केंद्रावरील असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. त्यातच एका केंद्रावरील ७८ विद्यार्थ्यांना एकसमान गुण मिळाल्याचा दावा करण्यात येतोय. शिष्यवृत्तीच्या परीक्षेत सामूहिक कॉपीचे प्रकार पुढे आल्यानं शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून ही परीक्षा घेतली जाते. लोहारा तालुक्यातील विद्यार्थ्यांना समान गुण मिळाले आहेत. त्यामुळे संशय बळावल्यानं हा सामूहिक कॉपी केल्याचा धक्कादायक प्रकार घडलाय. याची चौकशी करावी. तसंच संबंधितावर कारवाई करावी, अशी मागणी प्राथमिक शिक्षक महासंघानं शिक्षण विभागाकडे केली आहे.

मास कॉपी प्रकरणी ५ जणांची चौकशी समिती स्थापन करण्यात आलीय, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांनी दिली आहे. शिक्षण विभागाची बैठक घेऊन अधिकाऱ्यांना त्यांनी तंबी दिली आहे. ८ दिवसात अहवाल सादर करण्याचे समितीला आदेश देण्यात आले आहेत. दोषी आढळल्यास तत्काळ कारवाई करणार असल्याचं मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. दुर्बल घटकातील होतकरू मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणं हा शिष्यवृत्तीमागील मुख्य उद्देश आहे. मात्र दुर्दैवानं याही परीक्षांमध्ये कॉपी झाल्यास योग्य त्या घटकाला न्याय मिळणं दुरापास्त आहे. कॉपीमुक्त अभियान राबवण्याचा सरकारचा हेतू आहे. शिष्यवृत्तीच्या परीक्षेत सामूहिक करणाऱ्यांना धडा शिकवला जाणं महत्त्वाचं आहे. त्यामुळे आता काय कारवाई होणार याकडे लक्ष लागलं आहे.

# मे महिन्यात गडकरी रंगायतनची 'घंटा' वाजणार?



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार खासदार नरेश म्हस्के यांनी राम गणेश गडकरी रंगायतनच्या कामाची पाहणी केली. या दौऱ्यास महापालिकेचे नगरअभियंता प्रशांत सोनग्रा, उपनगर अभियंता (विद्युत) शुभांगी केसवाणी, उपअभियंता आसावरी सोरटे कार्यकारी अभियंता भगवान शिंदे, आदी उपस्थित होते.

**■ठाणे** : ठाण्याचे भूषण व सांस्कृतिक ओळख असलेले समस्त नाट्यकलावंताचे हक्काचे व्यासपीठ ठरलेले राम गणेश गडकरी रंगायतन मे महिन्यामध्ये ठाणेकरांच्या सेवेत दाखल करण्याच्या सूचना देत असतानाच कामाची गती वाढविण्याचे निर्देश खासदार नरेश म्हस्के मंगळवारी प्रशासनाला दिले. ज्येष्ठ नागरिकांसाठी लिफ्टची सोय, नाट्य व सिनेमांसाठी लागणारी ध्वनी व्यवस्था, आरामदायी आसन व्यवस्था, अशा अत्याधुनिक सोयींनी ठाणेकरांसाठी सज्ज होत असून आतापर्यंत महापालिकेने केलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच रंगकर्मींना गैरसोय होणार नाही, यासाठी त्यांना आवश्यक असलेल्या सर्व आवश्यक असलेल्या बाबींचा अंतर्भाव करण्याच्या सूचनाही खासदारांनी यावेळी दिल्या. संपूर्ण रंगायतनची पाहणीदरम्यान रंगायतनच्या पाठीमागच्या लॉनमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी तयार करण्यात येत असलेल्या लिफ्टच्या जागेची पाहणी केली. रंगायतनच्या मुख्य सभागृहाची पाहणी करत असताना आसनव्यवस्था या आरामदायी असाव्यात. तसेच स्टेजवरची ध्वनी व्यवस्था सर्वोत्तम दर्जाची असावी, रंगमंचावरील ध्वनी व्यवस्था व प्रेक्षागृहातील ध्वनी व्यवस्था स्वतंत्र असल्या पाहिजेत, असेही खासदार म्हस्के यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे वातानुकूलित यंत्रणा ही दोन्ही ठिकाणी स्वतंत्र ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्रेक्षागृहात लाइट व्यवस्था, ध्वनी व्यवस्था यंत्रणेसाठी पुरेशी व्यवस्था करावी तसेच पीठाची उंची मर्यादित ठेवावी जेणेकरून पहिल्या रांगेतील प्रेक्षकांना त्याचा त्रास होणार नाही. तसेच प्रोजेक्टरची व्यवस्था करण्याबाबतही त्यांनी सूचित केले. नूतनीकरण करत असताना प्रेक्षागृहातील बाल्कनीमधून देखील संपूर्ण स्टेज दिसेल, अशी व्यवस्था केल्याबद्दल खासदारांनी समाधान व्यक्त केले.







हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com